**CNR NO-MHSO060003382021**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३०/२०२१**
**खंडू लाडे व इतर.**
**वि.**
**पुष्पा लाडे व इतर.**

## नि.२० वरील आदेश
## (घोषित दि. २९/०९/२०२३)

०१] प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'अर्ज विना म्हणणे' चालविणे बाबतचा आदेश रद्द करुन मिळणेकरीता व दाखल केलेले म्हणणे स्वीकारणेकरीता केलेला आहे.

०२] अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जास विरोध करण्यात आलेला असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३] अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता मुळ अर्ज दाखल केलेला असून सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी विहित मुदतीत आपले म्हणणे सादर न केल्यामुळे दि.०६/०७/२०२३ रोजी सामनेवाला विरुध्द प्रस्तुतचा अर्ज 'विना म्हणणे' चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. सामनेवाले यांचे म्हणणेनुसार ते मुंबई येथे राहत असल्यामुळे तथा त्यांना विहित मुदतीत कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे ते आपले म्हणणे दाखल करु शकलेले नाहीत. सामनेवाले यांनी जाणिवपुर्वक विलंब केला असे म्हणण्यास कोणताही वाव नाही. मुळ अर्ज हा वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला असून सामनेवालादेखील मयत ज्ञानोबा लाड यांचे वारस असल्याचे कथन करीत आहेत. अश्या परिस्थीतीत मुळ अर्ज गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता सामनेवालाचे म्हणणे पटलावर असणे आवश्यक आहे. सामनेवाला यांनी केलेल्या विलंबामुळे अर्जदारांना नुकसानभरपाई मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ सामनेवाला क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द झालेला अर्ज 'विना म्हणणे' चालविण्याबाबतचा आदेश खर्च रक्कम रु.४००/- लावून रद्द करण्यात येतो. खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर सामनेवाला यांनी दाखल केलेले म्हणणे पटलावर घेण्यात येते

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2023.09.29 17:40:14 +0530

दि.२९/०९/२०२३.

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 29.09.2023 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 29.09.2023 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 29.09.2023 |